**नि.दि.दा.कं. :-१५/२०१८**
**रूपराव वि. कमलाबाई**
**नि.क :- २७**

**वादीतर्फे साक्षीदार कं.०१ चा सरतपास शपथेवर श्री पालीवाल वकील साहेब:**

०१. मी साक्षीपुराव्या करीता शपथपत्र दाखल केलेले आहे. ते शपथपत्र माझया सांगण्याप्रमाणे तयार करण्यात आले. मी शपथपत्र वाचून बघितले. त्यातील मजकुर खरा व बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे. त्यास नि.२७ देण्यात येत आहे.

२. आता मला नि.२५ च्या कागदयादीसोबत दाखल केलेले कागदपत्र दाखविण्यात आले. अ.क्र.१ वर फेरफार क्र.६९८/१९९४ उतारा दाखल केला आहे. त्यास **नि.क्र.२८** देण्यात येत आहे. अ.क्र.२ वर तहसीलदार यांना दि.०३. ०४.२०१२ रोजी दिलेला अर्जाची छायांकीत प्रत दाखल केली आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यावर माझी सही आहे तसेच तहसील कार्यालया येथील साकरे बाबु यांची सही आहे. त्याला **आर्टीकल - अ** देण्यात येत आहे. अ.क्र. ३ वर तहसीलदार यांचा दि.३०.०७.२०१२ रोजीच्या आदेशाची साक्षांकीत प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.क्र.२९** देण्यात आले. अ.क्र.४ वर दि.१३.०३.२०१३ रोजी तहसीलदार यांना दिलेला अर्ज. त्यावर तहसील कार्यालय व उपविभागीय कार्यालय यांचा सही शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.३०** देण्यात येते. अ.क्र.५ वर वर दि.०४.०७.२०१६ रोजी तहसीलदार यांना दिलेला अर्ज. त्यावर माझी सही आहे आणि तहसील कार्यालय यांचा सही शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **नि.३१** देण्यात येते.

३. अ.क्र.६ वर दि.०३.०५.२०१७ रोजी तहसीलदार यांना दिलेल्या अर्जाची छायांकीत प्रत दाखल केली आहे. त्यावर तहसील कार्यालय

पारशिवनी यांचा सही शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **आर्टीकल – ब** देण्यात येत आहे. अ.क्र.७ वर दि.१२.०५.२०१७ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांना दिलेल्या अर्जाची छायांकीत प्रत दाखल केली आहे. त्यावर जिल्हाधिकारी कार्यालय नागपूर यांचा सही शिक्का आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **आर्टीकल – क** देण्यात येत आहे. अ.क्र.८ वर मला तहसील कार्यालयातून प्राप्त झालेली दि.०५.०४.२०१७ रोजीची नोटीसीची छायांकीत प्रत दाखल केली आहे. त्यावर नायब तहसीलदार यांची सही आहे व माझी नोटीस स्विकारणार म्हणून सही आहे. त्यातील मजकूर बरोबर आहे. त्यास **आर्टीकल – ड** देण्यात येत आहे.

४. अ.क्र.९ वर तहसीलदार पारशिवनी यांनी दि.०५.०५.२०१७ रोजी दिलेले पत्राची छायांकीत प्रत दाखल केली आहे. त्यावर नायब तहसीलदार यांची सही आहे. त्यास **आर्टीकल – ई** देण्यात येते. अ.क्र.१० वर दि.०७.०५.२०१७ रोजीचा दैनिक पुन्यनगरी वृत्तपत्रात दिलेली बातमीची कॉपी दाखल केली आहे. सदर बातमी तहसील कार्यालयाच्या कारभाराबाबत व प्रतिवादी क्र.२ याच्या मनमानी कारभाराबाबत दिली होती. वर्तमानपत्राची मुळ प्रत दाखल केली आहे. त्यास **नि.३२** ओळखपुर्ती देण्यात येते.

सरतपास पुर्ण.

प्रतिवादी क्र.२ हजर मात्र भुपेश पाटील वकील साहेब गैरहजर.

सबब न्यायाच्यादृष्टीने संधी देवून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृत

समक्ष

(ओ.जे. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी.
दिंनाक:-०९/०३/२०२३

(ओ.जे. कुलकर्णी)
दिवाणी न्यायाधीश क.स्तर
पारशिवनी.